आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून ग्रामीण रुग्णालय बल्लारपूर येथे ५ मे रोजी आरोग्य जनसंवाद सत्राचे आयोजन

नागरिकांना आरोग्य समस्यांवर थेट संवादाची मिळणार संधी

शासकीय दवाखाने व ग्रामीण रुग्णालयांबाबतच्या तक्रारी-सूचना थेट प्रशासनापर्यंत पोहोचणार

चंद्रपूर, दि. २ मे : राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील नागरिकांच्या आरोग्यविषयक समस्या जाणून घेण्यासाठी व शासकीय आरोग्य सेवांमध्ये अधिक प्रभावी सुधारणा घडवून आणण्यासाठी ग्रामीण रुग्णालय बल्लारपूर येथे दि. ५ मे २०२६ रोजी दुपारी ३ वाजता “आरोग्य जनसंवाद सत्राचे” आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला आमदार श्री. मुनगंटीवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्नांना सर्वोच्च प्राधान्य देत आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी हा “आरोग्य जनसंवाद” उपक्रम राबविण्यात येणार असून शासकीय दवाखाने, प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच ग्रामीण रुग्णालयांशी संबंधित समस्या, तक्रारी आणि सूचना नागरिकांना थेट प्रशासनापर्यंत मांडता याव्यात, यासाठी हा संवादाचा प्रभावी मंच ठरणार आहे. आरोग्य सेवा अधिक सक्षम, लोकाभिमुख आणि उत्तरदायी व्हाव्यात, यासाठी प्रशासन आणि जनतेमध्ये थेट संवाद निर्माण करण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात येत आहे.

या जनसंवाद सत्रात आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या ऐकून घेणार आहे. त्यासोबतच त्यावर तात्काळ उपाययोजना करण्याबाबत आवश्यक निर्देशही दिले जाणार आहेत. ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार सातत्याने पाठपुरावा करत असून, त्याचाच एक भाग म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे.

बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील नागरिकांनी या “आरोग्य जनसंवाद सत्रात” मोठ्या संख्येने सहभागी होत आपल्या आरोग्यविषयक समस्या, तक्रारी, सूचना आणि अपेक्षा निर्भीडपणे मांडाव्यात, जेणेकरून त्या थेट प्रशासनाच्या निदर्शनास येऊन त्यावर प्रभावी व तातडीने कार्यवाही करता येईल, असे आवाहन आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.